# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ४८ वी बैठक दिनांक २७ जून २००६

## ठराव

मा.ना.रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ४८ वी बैठक दिनांक २७.६.२००६ रोजी जलसंपदा विभागाचे सभागृह मुंबई येथे संपन्न झाली. दिनांक २७/६/०६ रोजी ठीक ४.०० वा. मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) यांचे सभागृहात आगमन झाले. तद्नंतर ४.१५ वाजेपर्यंत मा.अध्यक्ष, उपस्थित सदस्य व सदस्य सचिव यांनी अन्य सदस्यांची वाट पाहिली. मा.मंत्री महोदयांनी सर्व सदस्यांनी बैठकीस वेळेवर उपस्थित राहण्याच्या सूचना देउन बैठक सुरु करण्याचे निर्देश दिले.सदर बैठकीत विषयवार चर्चा होउन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

**ठराव क्र. ४८/१**

**"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ४७ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत."**

**ठराव क्र. ४८/२**

**"ठराव करण्यात येतो की, महामंडळाकडील आर्थिक दायित्वाचा विचार करता व महामंडळाकडे निधीचा स्वतंत्र स्त्रोत नसल्याने प्रलंबित दायित्वाची मागणी शासनाकडे करण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र.: ४८/३**

**"ठराव करण्यात येतो की, यापुढील सन २००४-०५ पासून पुढील वार्षिक अहवाल हे स्वतंत्र लेखापरिक्षण अहवाल प्राप्त होणेस अवधी असलेस स्वतंत्र लेखापरिक्षण अहवाल किंवा त्याच्या अनुपालनाशिवाय नियामक मंडळाच्या मान्यतेनंतर शासनाच्या मान्यतेने विधीमंडळास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

ठराव क्र. ४८/४

"ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कर्जरोखे मालिका आणि बिल डिस्काउंटीग मालिका यांची मुद्दल परतफेड व नियमित व्याजप्रदाने अदायगीसाठी शासनाने दिलेल्या हमीसाठी, हमीशुल्क व त्यावरील दंडनीय व्याज, महामंडळास स्वतंत्र आर्थिक स्त्रोत नसल्याने शासनांस अदा करणे शक्य होत नाही यास्तव हे हमीशुल्क व त्यावरील विलंबासाठीचे दंडनीय व्याज कायमस्वरुपी माफ करण्यासाठी शासनास विनंती करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ४८/५

"ठराव करण्यात येतो की, वार्षिक योजना २००६-२००७ च्या रू. ४२४.५८५८ कोटीच्या प्रकल्पनिहाय आर्थिक कार्यक्रमास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे. सदर कार्यक्रम शासनास सादर करण्यात यावा. तसेच प्रकल्पनिहाय तरतूदीमध्ये आवश्यकतेनुसार उचित बदल (जिल्हानिहाय तरतूदीच्या मर्यादेत ) करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने कार्यकारी संचालक यांना देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

नियामक मंडळाने मान्यता दिलेला आर्थिक कार्यक्रम परिशिष्ट क्र. १ वर जोडण्यात आलेला आहे.

ठराव क्र. ४८/६

"ठराव करण्यात येतो की, केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय प्रकल्पांतर्गत लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड यांना मान्यता मिळालेल्या १९ लघु पाटबंधारे तलावांपैकी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे मालकीची १४ तलावांची दुरुस्ती, नूतनीकरण व पुनर्स्थापनेची कामे या महामंडळावर कोणतेही दायित्व/आर्थिक भार येणार नाही या अटीवर लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड यांनी करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. "

परिशिष्ट क्रमांक २ वर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या १४ ल.पा. प्रकल्पांची नांवे जोडली आहेत.

ठराव क्र. ४८/७

"ठराव करण्यांत येतो की, ल. पा. निट्टूर क्र. २, ता. चंदगड, जि. कोल्हापूर योजनेतील लाभधारक सहकारी पाणीवापर संस्था स्थापन करून उपसा सिंचन योजना उभारणी खर्चासह देखभाल व व्यवस्थापनाचा खर्च करण्यास तयार असतील तर उपरोक्त योजनेचे कालवे वगळून जलाशयातून उपसाद्वारे सिंचनाचा लाभ देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्यासाठी जलाशयामध्ये १४ टक्के पेक्षा जास्ती पाणी ठिबक सिंचनासाठी आरक्षित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) | कार्यकारी संचालक |
| व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे | म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

ठराव क्र.४८/८

"ठराव करण्यांत येतो की,

१. डिसेंबर-२००५ ते जून-२००६ मध्ये ताकारी टप्पा १ व २ आणि म्हैसाळ टप्पा १ ते ३ चे आवश्यक पंप चालू करुन ताकारी भागा अंतर्गत ७ आवर्तनाद्वारे अंदाजे ३००० हेक्टर क्षेत्रांस व म्हैसाळ भागाअंतर्गत ४ आवर्तनाद्वारे अंदाजे १२३९ हेक्टर क्षेत्रांस पाणी देण्यांच्या नियोजनांस विशेष बाब म्हणून नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.
२. वरील १ प्रमाणे पाणी देण्यासाठी ताकारी टप्पा १ व २ करिता रुपये २७५०/- प्रति हेक्टर प्रति आवर्तन व म्हैसाळ टप्पा १ ते ३ करिता रुपये ४९५०/- प्रति हेक्टर प्रति आवर्तन या दराने आकारणी करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

३. वरील २ प्रमाणे वसूल झालेल्या रकमेतून डिसेंबर-२००५ ते जून-२००६ मध्ये ताकारी टप्पा १ व २ आणि म्हैसाळ टप्पा १ ते ३ च्या चालू केलेल्या पंपाची वीज देयके अदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

ठराव क्रमांक. ४८/९

"ठराव करण्यात येतो की, दुधगंगा प्रकल्पांतर्गत लाभक्षेत्राच्या शेवटच्या भागात (Tail end) महाराष्ट्र राज्याच्या हद्दीमधील दत्तवाड, दानवाड व घोसरवाड या ३ गावच्या क्षेत्रास सिंचनाचा लाभ व्यवस्थित व परिणामकारक रितीने मिळण्यासाठी तसेच राज्याच्या सीमेवर पाणी मोजणे परिणामकारक होण्यासाठी दुधगंगा प्रकल्पाचा भाग म्हणून दत्तवाड ता. शिरोळ जि. कोल्हापूर येथे रु.३.३१ कोटी अंदाजित किंमतीचा को.प.बंधा-याचे बांधकाम हाती घेण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे. सदर को.प.बंधा-याच्या खर्चाचा समावेश दुधगंगा पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यताच्या प्रस्तावात करण्यात यावा व दत्तवाड को.प.बंधा-यामुळे अधिच्छादीत (ओव्हरलॅप) होणारे दुधगंगा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील त्या भागातील कालव्यावरील खर्च कमी करण्यात यावा."

ठराव क्र. ४८/१०

"ठराव करण्यांत येतो की, टेंभू व ताकारी योजनांची वितरण व्यवस्थेची (पोटकालवे-खोदाई व बांधकामे ) कामे ज्या-त्या कारखान्यांच्या कार्य क्षेत्राप्रमाणे स्वतंत्र करारपत्रावर (निविदा न बोलविता ) शासन जलसंपदा विभागाचे प्रारुप करारनाम्याच्या मान्यतेच्या अधिन राहून त्या-त्या कारखान्यामार्फत स्वबळावर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. "

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) | कार्यकारी संचालक |
| व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे | म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

ठराव क्र. ४८/११

**"ठराव करण्यांत येतो की, श्री सावळसिद्ध शिक्षण संस्था, सावळज, ता. तासगांव, जिल्हा सांगली यांना सावळज येथील जलसंपदा विभागाची मोकळी जागा व इमारत भाडेपट्टा तत्वावर ३० वर्षे मुदतीने देणेसाठी शासन निर्णय / परिपत्रकातील तरतूदी तपासून निर्णय घेण्यात यावा. याबाबतची आवश्यक ती कार्यवाही मा.अध्यक्षांचे मान्यतेने कार्यकारी संचालक यांनी करणेस नियामक मंडळाची मान्यता देणेत येत आहे."**

तद्नंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने मा.अध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी जाहीर केले.

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे